


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक १२५, बुधवार २४ जानेवारी २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# छातीवर गोळया झाडल्या तरी मागे हटणार नाही!

## ■ मनोज जरांगे यांचे प्रतिपादन ■ सुपे येथे भव्य स्वागत

**सुपे : खूप वर्षांनी मराठयांची जात एक झाली, अनेक जण पाण्यात देव ठेऊन होते मराठे एकत्र होऊ नये यासाठी. ते प्रगती करतील यासाठी. मराठयांना एक न होऊ देण्यासाठी फार प्रयत्न झाले. छातीवर गोळया झाडल्या तरी मनोज जरांगे मागे हटणार नाही असे सांगत संघर्ष योध्दा मनोज जरांगे यांनी आरक्षण घेतल्याशिवाय हटणार नाही असा निश्चय सुपे येथे बोलताना केला.**

जरांगे पाटील म्हणाले, मराठा बांधवांनी एकजुट दाखविली हे उपकार कधीच विसरणार नाही. ही शेवटची लढाई आहे ती आपल्याला जिंकायची आहे. जरांगे यांचे भाषण सुरू असताना पोलीस प्रशासनातील कर्मचाऱ्याने लोकांना खाली बसविण्यास सांगा अशी विनंती केली, त्यावर तुमचेचे लोक आहेत, तुम्हीच त्यांना सांगा असे सांगत जरांगे पाटील यांनी त्या कर्मचाऱ्यास सुनावले. ते म्हणाले, मला व्यासपीठ वगैरे कशाचाही मोह नाही मला जातीचा मोह आहे. मराठयाचे लेकरं मला मोठे करायचे आहेत. तुमच्या सगळयांच्या ताकदीवर ही लढाई आपल्याला जिंकायची आहे.




आतापर्यंत या सरकारने आपल्या लेकरांचे वाटोळे या सरकारने केले आहे. आम्ही लढे उभे केले, आणि यांनी आमचा अपमानच केला आहे. मराठा समाज करोडोच्या संख्येने एकत्र आला आणि सरकार काम करायला लागले आहे. आमची सरकारकडे प्रामाणिक मागणी आहे. ज्यांच्या नोंदी सापडल्या आहेत त्यांना आरक्षण द्या. मग कोणीही किती आडवं येऊ द्या आम्ही सक्षम आहोत असा एल्गार जरांगे पाटील यांनी केला.



■ मराठा आरक्षणासाठी मुंबईकडे निघालेल्या मनोज जरांगे पाटील यांची सुपे येथे सभा झाली.

### सरकारचा एकच प्रॉब्लेम

मी माझ्या गोरगरीब मराठी बांधवांसाठी काम करतोय, सरकारचा एकच प्रॉब्लेम आहे, मी त्यांना मॅनेज होत नाही, मी फुटत नाही. मी इमानदारीने काम करतोय, त्यामुळे सरकार मला शत्रू म्हणू लागले आहे. मराठा समाजासाठी सरकारने मला शत्रू मानले तरी मी त्या सरकारला मोजत नाही.

### तर तुम्ही रस्त्यावर उतरा

मराठा समाजाच्या पोरांना मुंबईत त्रास दिला गेला तर गावाच्या मराठा बांधवांनी रस्त्यावर उतरले पाहिजे. मराठा समाजाने सरकारला सात महिन्यांचा वेळ दिलाय. तरीही सरकार वेळ मागते आहे. तुम्ही रस्त्यावर उतरा असे आवाहन जरांगे पाटील यांनी केले.

### असे चाळे करू नका

का उभे राहिले ? असा प्रश्न उपस्थित करून जरांगे पाटील म्हणाले, कोणीही उभे राहू नका, चाळे करू नका? हा लढा आपल्याला निकारीने लढायचा आहे असे सांगत जरांगे यांनी मराठा बांधवांची एकजुट तुटू न देण्याचे आवाहन केले.

### त्यांचा कार्यक्रम उलटा केला !

आजवर कोणी मराठा आंदोलनावर कोणीही बोलले नाही. एक दोन जण आडवे आले होते, त्यांचा कार्यक्रम उलटा करून टाकला. एकच राहिलंय ते पण गप्प बसलंय, पुढे बोलला तर भजे खाल्लेले कागद नाही गोळा करायला लावले तर माझी मराठयाची जात नाही असे सांगत जरांगे यांनी मराठा आरक्षणास विरोध करणारांना इशारा दिला.

### आमची लेकरं महत्वाची

मराठयांचे आरक्षण आम्ही मिळवणार आहोत. आमच्या लेकारांच्या नरडयाला कोणी नख लावायचा कोणी प्रयत्न करू नये. आम्हाला पक्षापेक्षा आमचे लेकरं महत्वाचे आहेत. आमची लेकरंही आयएएस, आयपीस झाले पाहिजेत. त्यासाठी हा संघर्ष सुरू आहे. मराठा श्रीमंत असो वा गरीब प्रत्येक मराठयाला आरक्षण मिळाले पाहिजे.त्यासाठी आपण सर्वांनी आरक्षण मिळेपर्यंत मराठा म्हणून काम करायचे आहे.

### गुलाल टाकल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही

नगर जिल्हयातील बांधवांना विनंती आहे, तुमच्या पाठबळावर मी मुंबईकडे वाटचाल करतो आहे. मी माझ्या मरणाला भित नाही. कितीही सरकार येऊ द्या, मराठयांच्या मुलांवर गुलाल टाकल्याशिवाय मी स्वस्थ बसणार नाही. समाजासाठी मी माझा परिवारही पाहत नाही. माझ्या समाजाने मला फार प्रेम दिले आहे. तुमची एकजुट फुटू देऊ नका ही माझी विनंती असल्याचे जरांगे म्हणाले.

### मराठा ओबीसींमध्ये वाद लावण्याचा प्रयत्न

गावखेडयातील ओबीसी बांधव व मराठयांमध्ये वाद निर्माण करण्याचा फार प्रयत्न झाला मात्र तसे झाले नाही. मराठी बांधवांनी हा दुरावा होऊ देऊ नये. राजकारणी माणूस मराठा व ओबीसी बांधवांमध्ये वाद निर्माण करीत आहे. आजही ओबीसी, मराठा बांधव एकमेकांच्या मदतीला जातात. हे प्रेम जपा.

मनोज जरांगे, मराठा योध्दा

# ... तर पुन्हा रामराज्य निर्माण होईल!

## ■ पद्मश्री पोपटराव पवारांचा पारनेर दर्शनशी संवाद ■ आता राज्यकर्त्यांची जबाबदारी वाढली ■ भविष्यात भारत जगाला प्रेरणा देईल

**पारनेर : विशेष प्रतिनिधी**

**अयोध्येत प्रभू रामचंद्र विराजमान होतानाचा सोहळा याच देही याच डोळा पाहिला असा अभूतपूर्व सोहळा भविष्यात होणे नाही. या सोहळ्याप्रसंगी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्र निर्माणाची संकल्पना मांडली ही संकल्पना वास्तव्यात येण्यासाठी प्रशासकीय अंमलबजावणी होणे गरजेचे असल्याचे सांगतानाच ही संकल्पना प्रत्यक्षात अंमलात आल्यास रामराज्य निर्माण होईल. आता राज्यकर्त्यांची नैतिक जबाबदारी वाढल्याचे आदर्श गाव योजनेचे कार्याध्यक्ष,पद्मश्री पोपटराव पवार यांनी थेट अयोध्यावरून पारनेर दर्शनशी संवाद साधताना सांगितले.**

अयोध्येचे रामलल्लाच्या प्रतिष्ठापनेचे विशेष आमंत्रण पोपटराव पवार यांना देण्यात आले होते. हिवरे बाजार ग्रामस्थांनीही या सोहळ्यास जाण्यासाठी पद्मश्री पवार यांना समारंभपूर्वक निरोप दिला होता. विशेष निमंत्रणानुसार

उर्वरीत पान ३ वर



### भारत जगाला प्रेरणा देणार

रामराज्यात संस्कार,अध्यात्म आणि प्रेम होते.अयोध्येत प्रभू रामचंद्र विराजमान झाल्यानंतर पुन्हा आपल्या मातीतली ताकद आणि प्रेरणा निर्माण झाली आहे. त्यामुळे भविष्यकाळात भारत जगाला प्रेरणा देणार.

### भेदभाव नाही

रामलल्ला प्रतिष्ठानचा सोहळा अनुभवण्यासाठी देश परदेशातील भारतीय नागरिक उपस्थित होते.सर्वांनीच हा सोहळा अनुभवला,परंतु निमंत्रितांच गाभाऱ्यात जाता आले.यामध्ये निवडक सात हजार जण होते परंतु यामध्ये व्हीआयपी असा कोणताही भेदभाव नव्हता

### हीच माझी प्रार्थना

प्रभू रामचंद्राच्या मूर्तीजवळ नतमस्तक होऊन आपण ध्यानधारणा केली. आरक्षणाचा संघर्ष थांबावा.सर्वांना उत्तमशिक्षण व उत्तम आरोग्य लाभावे.जाती-जातीतील संघर्ष कमी व्हावा.व्यसनाधीनता दूर व्हावी अशीच प्रार्थना आपण प्रभू रामांच्या चरणांशी व्यक्त केली.

पोपटराव पवार

# मला दगाफटका झाला तरीही तुम्ही आरक्षणाचे आंदोलन चालू ठेवा !

## ■ मनोज जरांगे पाटील यांचे भावनिक आवाहन ■ कारेगाव येथे रात्री अडीच वाजता सभा ■ सभेला लाखोंचा जनसमुदाय उपस्थित

**शिरूर : सतीश डोंगरे**

**'मराठे कोणाला घाबरत नाहीत, हे दाखवून देण्याची वेळ आता आली आहे. मात्र आता राज्यभरातील मराठा समाज एकवटला असून तुम्हाला तुमची जागा दाखवून देण्याची वेळ आली आहे. सरकारने कोणताही डाव टाकला तरीही तो आता यशस्वी होऊ देणार नाही. कोट्यावधी मराठ्यांच्या बळावरच मी मुंबईला चाललो असून, परत येईन की नाही हे माहीत नाही. मला दगाफटका झाला तरीही तुम्ही आरक्षणाचे आंदोलन चालू ठेवा,' असे भावनिक आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले.**



पुणे नगर रस्त्यावरील कारेगाव येथे जरांगे पाटील यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. तत्पूर्वी कारेगाव येथील मराठा समाजाच्या वतीने क्रेनच्या सहाय्याने भला मोठा पुष्पहार घालून जरांगे पाटलांचे स्वागत करण्यात आले. गावातील मुख्य प्रवेशद्वारावर छत्रपती शिवाजी महाराजांची जरांगे पाटलांच्या हस्ते आरती करण्यात आली. जरांगे पाटील यांच्या सभेपूर्वी व्यासपीठावर शाहिर संतोष साळुंके यांनी जरांगे पाटील यांच्यावर रचलेल्या पोवाड्यांच्या प्रेक्षकांना खिळवून ठेवले.

'लाखोंचा जनसमुदाय माझ्यासोबत आहे, त्या बळावरच आरक्षण आणण्यासाठी मुंबईला निघालोय आता कोणत्याही परिस्थितीत माघार नाही तुम्ही सर्वांनी एकजूट ठेवा आणि मुंबईच्या आंदोलनात सर्वांनी सहभागी व्हा''असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले.

शासन निर्णय घ्यायला चालढकल करत आहे मुदत

उर्वरीत पान ३ वर

# अयोध्येत लोटला रामभक्तांचा महापूर

## ■ गर्दीमुळे सर्व सीमा केल्या बंद ■ प्रशासनाचा मोठा निर्णय ■ पोलीस बंदोबस्त तैनात

**अयोध्या : वृत्तसंस्था**

**अयोध्येतील श्री राम मंदिराचा अभिषेक झाल्यानंतर दर्शनासाठी रामभक्तांची गर्दी झाल्याने सर्व सीमा पुन्हा सील करण्यात आल्या आहेत. अयोध्येकडे कोणत्याही वाहनाला जाऊ दिले जात नाही. बांबूच्या खांबांसह ट्रॉली बॅरिअर्स लावून पोलीस कर्मचाऱ्यांसह निरीक्षक तैनात करण्यात आले आहेत. सीमा सील केल्यामुळे लोकांच्या अडचणी वाढल्या आहेत.**



बांबूच्या काठ्यांसह ट्रॉली बॅरिअर्स लावून पोलीस कर्मचाऱ्यांसह निरीक्षक तैनात करण्यात आले आहेत. सीमा सील केल्यामुळे लोकांच्या अडचणी वाढल्या आहेत.

उर्वरीत पान ३ वर






स्मार्ट शेतकरी, स्मार्ट शेती

# शिवार

# रिंग स्पॉटचे नियंत्रण

**पपई पिकावर सद्य:स्थितीत विविध कीड-रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. रिंग स्पॉट व्हायरस या विषाणूजन्य रोगाचा त्यात प्रामुख्याने समावेश होतो. हा रोग अत्यंत नुकसानकारक असून, त्याच्या नियंत्रणासाठी वेळीच उपाययोजना कराव्यात. केळीनंतर सर्वाधिक उत्पन्न देणारे पपई हे फळपीक आहे. मात्र रिंग स्पॉट व्हायरस या रोगामुळे या पिकाखालील क्षेत्र घटत आहे. पपाया रिंग स्पॉट व्हायरस हा विषाणू या रोगास कारणीभूत असून रोगाची प्रारंभिक लक्षणे ओळखून वेळीच नियंत्रण करावे.**



## लक्षणे कोणती?

- रिंग स्पॉट विषाणूचा संसर्ग झालेले झाड १५ दिवसांनंतर लक्षणे दाखविण्यास सुरुवात करते.
- सुरुवातीला पाने फिकट हिरवी व पिवळसर होतात. पानाच्या शिरा हिरव्या दिसू लागतात. पानाच्या वरील बाजूस शिरा मुरडतात.
- रोगाचा प्रादुर्भाव वाढत जाईल तसा पानांचा आकार कमी होत जातो. पानांची टोके धाग्यांप्रमाणे किंवा बुटांच्या लेसप्रमाणे दिसतात.
- झाडे बुटकी राहतात. शेंड्यांची पाने जास्त तीव्र स्वरूपात लक्षणे दाखवतात.
- पाने जाड आणि खडबडीत होतात. रोगग्रस्त पानांचा स्पर्श लुसलुशीत वाटत नाही.
- पानांचा आकार लहान झाल्याने अन्नद्रव्ये तयार होण्याची क्रिया (प्रकाश संश्लेषण) मंदावते.
- खोडाचा शेंड्याकडील कोवळा भाग व कोवळ्या पानांच्या देठावर गर्द हिरव्या रंगाचे चट्टे दिसतात.
- पूर्णपणे विकसित झालेल्या हिरव्या फळावर अनेक वर्तुळाकार, समकेंद्री, पाणीदार डाग दिसतात.
- रोगग्रस्त झाडांची फळे लहान व वेडीवाकडी दिसतात.
- रोगग्रस्त झाडावरील फळांच्या संख्येत लक्षणीय घट होते.

## उपाययोजना करताना...

- सुरुवातीच्या अवस्थेतच रोगग्रस्त झाड मुळासकट उपटून, जाळून टाकावे. त्यामुळे शेतात विषाणूचा होणारा प्रसार वेळीच रोखण्यास मदत होते.
- मावा ही कीड या रोगाच्या विषाणूंची वाहक आहे. त्यामुळे मावा किडीच्या नियंत्रणासाठी शेतात एकरी २० पिवळे चिकट सापळे लावावेत.
- फळबागेच्या कुंपणावर मावा किडीस अडथळ्यासाठी मका आणि ज्वारी ही पिके लावावीत.
- पपईच्या बागेत आंतरपीक म्हणून किंवा बागेजवळ काकडीवर्गीय पिकांची लागवड करू नये.
- नत्रखताच्या अतिवापराने रोगाची तीव्रता वाढते. त्यामुळे नत्राची संतुलित प्रमाणात मात्रा द्यावी.
- पालाशयुक्त खतांमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते व रोगाची तीव्रता कमी होते. त्यामुळे पालाशयुक्त खतांचा शिफारशीनुसार संतुलित वापर करावा.
- मावा किडीचा प्रादुर्भाव दिसताच त्याच्या नियंत्रणाच्या उपाययोजना कराव्यात.



**फवारणी प्रतिलिटर पाणी**

**डायमेथोएट : १.५ मि.लि.त्यानंतर १५ दिवसांच्या अंतराने निंबोळी अर्क (१०,००० पीपीएम) : ५ मि.लि.**

# व्यवस्थापन तुती बागेचे...

**रेशीम शेतीत तुती पाल्याचा ६० टक्के वाटा असतो. तुती बागेत तण नियंत्रण, पाणी व्यवस्थापन, खत व्यवस्थापन, तुती बागेची छाटणी आणि पीक व्यवस्थापन या गोष्टी महत्त्वाच्या आहेत. दर्जेदार पाल्यामुळे रेशीम कीटकांची चांगली वाढ होऊन कोषांचे चांगले उत्पादन मिळते. शेतकरी पातळीवर रेशीम शेतीत तुती लागवड आणि कीटकसंगोपन हे फार महत्त्वाचे आहे. रेशीम कीटकांचे खाद्य तुतीची पाने असल्याने तुती पाल्याच्या दर्जावर रेशीम कीटकांची निरोगी वाढ होऊन दर्जेदार, भरघोस कोषांचे उत्पादन मिळते.**





## पहिल्या वर्षातील व्यवस्थापन

जून ते सप्टेंबर या कालावधीत पट्टा पद्धतीने तुती लागवड कलम आणि रोपांद्वारे आपण केलेली असेल. एकदा केलेली तुती लागवड जवळपास पंधरा वर्षांपर्यंत टिकते. त्यामुळे पंधरा वर्षांपर्यंत शेतकऱ्यास कोषांचे उत्पादन घेता येते. दरवर्षी नवीन तुती लागवड करावी लागत नाही. त्यामुळे पहिल्या वर्षी तुती बागेची निगा शास्त्रीय पद्धतीने करावी. योग्य व्यवस्थापनामुळे तुती बागेतील सर्व कलमे, रोपे जिवंत राहतात. त्याचबरोबरीने तुतीची मुळे, खोडांची एकसारखी वाढ होऊन पाल्याचे चांगले उत्पादन मिळते. उत्पादनाबरोबरच पाला रसरशीत दर्जेदार राहतो.

## आंतरमशागत करताना...

बागेतील वाढलेल्या तणांमुळे कलमांना सूर्यप्रकाश मिळत नाही, गवत वाढल्याने अन्नद्रव्ये कमी पडून तुतीची पाने गळून पडतात. बागेतील तापमानात वाढ होऊन तुती कलमांची पाने पिवळी पडतात. तुतीची लागवड केल्यापासून एक महिन्याने खुरपणी करून तण काढावे. तण काढताना तुती कलमांना धक्का लागणार नाही याची काळजी घ्यावी.

## बागेची छाटणी करताना...



लागवडीपासून साडेचार ते पाच महिन्यांनी आपण पहिले कीटकसंगोपन घेतो. फांदी पद्धतीने कीटक संगोपनात तुती पाल्याऐवजी संपूर्ण फांदी झाडाच्या बुडख्यापासून कापतात. छाटणी करताना जमिनीपासून ६ ते ८ इंच अंतरावर फांद्या कापाव्यात. ज्यामुळे पुढीलवेळी फांद्यांची संख्या वाढण्यास मदत होते. बैलजोडीने आंतरमशागतीची कामेही चांगल्याप्रकारे करता येतात. छाटणी करताना खोडाचे साल निघणार नाही, कलम, रोप मुळापासून उपटून निघणार नाही याची काळजी घ्यावी.

## खत नियोजन करताना...

तुती लागवड करण्यापूर्वी एकरी ८ ते १० टन शेणखत जमिनीत मिसळावे. पहिल्या वर्षी तुती बागेस रासायनिक खतांच्या दोन मात्रा द्याव्या लागतात. पहिली मात्रा साधारणपणे तुती लागवडीनंतर दोन ते अडीच महिन्यांनी तुती कलमांना मुळे फुटतात त्या वेळी द्यावी लागते. साधारणपणे माती परीक्षणानुसार एकरी २४ किलो नत्र आणि दुसरी मात्रा साधारणपणे ३ ते ४ महिन्यांनी एकरी २४ किलो पालाशची द्यावी.

## तुती रोपवाटिका

तुती कलमे काही कारणांनी १०० टक्के फुटू शकली नाहीत, तर बागेमध्ये झाडांची संख्या कमी होऊन त्याचा परिणाम पाला उत्पादनावर होऊन पिकांची संख्या कमी होण्यावर होतो. बागेत तुटाळ पडल्याचे पूर्ण बाग बहरल्यानंतर लक्षात येते. अशावेळी आपण बाद कलमांच्या जागी नवीन कलम लावून तुटाळ सांधण्याचा प्रयत्न करतो. परंतु, कलमाभोवतीची उंच वाढलेली तुतीची झाडे कलम फुटण्यावर परिणाम करतात. परिणामी नव्याने लावलेले कलम फुटत नाही. त्यामुळे तुटाळ भरून निघत नाही. तुटाळ भरताना कलमाऐवजी तुतीचे रोप लावावे. त्यामुळे अडचण येत नाही. तुटाळ राहण्याचा धोका लक्षात घेऊन नवीन तुती लागवड करतेवेळी प्रत्येक शेतकऱ्याने मोकळ्या पट्ट्यात किमान १००० ते १५०० कलमांची रोपवाटिका करावी.



## पाणी नियोजन

तुती लागवड कलम, रोपांद्वारे केली जाते. भारी जमिनीत लागवड केल्यापासून महिन्यातून दोनदा पाण्याच्या पाळ्या द्याव्यात. मध्यम जमिनीकरिता १२ ते १४ दिवसांनी पाण्याची पाळी द्यावी. हलक्या जमिनीसाठी आठ ते दहा दिवसांनी पाण्याची पाळी द्यावी. लागवड तुतीच्या कलमांपासून असल्याने व पहिल्या वर्षी तुती बाग नवीन असल्याने तुतीला योग्य प्रमाणात मुळ्या धरेपर्यंत जमिनीत ओलावा असावा. बागेला पाणी देण्यासाठी ठिबक सिंचन पद्धतीचा अवलंब करावा. या पद्धतीने पाणी कमी लागतेच, शिवाय पाण्याचा वापरही तुतीच्या वाढीस पोषक ठरतो. ठिबक संचनासाठी शासनाचे अनुदान उपलब्ध आहे. तुती बागेस खारवट, क्षारयुक्त पाणी कधीही देऊ नये. कारण याचे अनिष्ट परिणाम होऊ शकतात.

## दुसऱ्या वर्षांपासून तुती बागेचे व्यवस्थापन



पहिल्या वर्षी तणनियंत्रण, पाणी व्यवस्थापनाचे जसे नियोजन केले, त्याप्रमाणेच करावे. फक्त फरक खत व्यवस्थापनामध्ये येतो. दुसऱ्या वर्षांपासून पंधरा वर्षांपर्यंत खत व्यवस्थापनाकडे लक्ष देणे जरूरीचे आहे. केंद्रीय रेशीम संशोधन संस्थेच्या शिफारशीनुसार वर्षभरात एकरी १२० किलो नत्र, ४८ किलो स्फुरद आणि ४८ किलो पालाश या रासायनिक खतांच्या मात्रा पाच मात्रांमध्ये विभागून द्याव्यात. पहिल्या रासायनिक खताची मात्र साधारणपणे जूनमधील बागेच्या छाटणीनंतर नांगरट, वखरणी करून १५ दिवसांनी २४ किलो नत्र, २४ किलो स्फुरद आणि २४ किलो पालाश ही खतमात्रा द्यावी. दुसरी खत मात्रा सप्टेंबर महिन्यात एकरी २४ किलो नत्राची द्यावी. तिसरी मात्रा ऑक्टोबर महिन्यात २४ किलो नत्र, २४ किलो स्फुरद, २४ किलो पालाशची द्यावी. चौथी मात्रा डिसेंबर महिन्यात २४ किलो नत्राची द्यावी, तर शेवटची पाचवी रासायनिक खताची मात्रा फेब्रुवारी महिन्यात २४ किलो नत्राची द्यावी. रासायनिक खतांचा वापर कमी करण्यासाठी गांडूळ खत, हिरवळीची खते, जैविक खते, सूक्ष्म अन्नद्रव्यांची फवारणी करणे शक्य आहे. याच्या वापरातून तुती पाल्याचे उत्पादन वाढवू शकतो. बागेतील प्रत्येक तुती झुडपास फक्त ८ ते १० फांद्या ठेवाव्यात. जमिनीलगत वाढलेल्या अनावश्यक फांद्या काढून टाकाव्यात. असे केल्याने पाल्याचा दर्जा राखण्यास मदत होते. झाडाचीही योग्य वाढ होते. बागेतून वेळोवेळी फेर फटका मारावा. बागेतील रोगट, कीडग्रस्त पाने तोडून नष्ट करावीत. तुतीचा हिरवागार, पौष्टिक पाला कीटकांनी खाल्ल्यास चांगल्या प्रतीच्या वजनदार कोषांची निर्मिती होते.

# कोंबड्यांच्या शेडमध्ये हवा ठेवा खेळती!

**कुक्कुटपालन करताना पावसाळ्यातील दमट हवामानामुळे व कमी सूर्यप्रकाशामुळे शेडमधील साहित्य कोरडे राहत नाही. वातावरण दमट आणि रोगट बनते. पाणी शेडमध्ये येऊ नये म्हणून पडदे लावल्यामुळे शेडमध्ये हवा खेळती राहत नाही. त्यामुळे अमोनिया, मिथेनसारखे वायू साठून राहतात व त्यामुळे परजीवीजन्य आजार व श्वसनाचे आजार पक्ष्यांमध्ये उद्भवतात. पावसाळ्यामध्ये शेडभोवती दलदल होऊन डास व माशांचे प्रमाण वाढते. यामुळेही पक्ष्यांच्या आरोग्यावर वाईट परिणाम होतो. दूषित, अस्वच्छ पाण्यामुळे पक्ष्यांमध्ये ई-कोलायचा प्रादुर्भाव वाढतो.**

## या करा उपाययोजना...



- शेडला खाद्याची पोती पडदे म्हणून न लावता, शेडमध्ये पाणी येऊ नये म्हणून प्लास्टिकचे पडदे वापरावेत.
- शेडमधील वायूविजन व्यवस्थित राहण्यासाठी, तसेच शेडमधील हवा खेळती राहण्यासाठी पाऊस बंद असताना दुपारच्या वेळी थोडा सूर्यप्रकाश असतो, त्या वेळी पडदे उघडावेत.
- शेडमधील गादी (लीटर) कोरडी व सुटसुटीत राहण्यासाठी दिवसातून २ ते ३ वेळा गादी खाली- वर करावी. गादीच्या साहित्यात ओलावा वाटत असल्यास थोडा चुना किंवा नवीन गादीचे साहित्य मिसळावे.
- पक्ष्यांना गढूळ पाणी न देता स्वच्छ, निर्जंतुक पाणी द्यावे.
- रक्ती हागवणीचा प्रादुर्भाव होऊ नये याकरिता खाद्यामध्ये कॉक्सीडिओस्टॅट औषधे वापरावीत.
- पावसाच्या पाण्याची गळती होऊन लीटर भिजणार नाही याची काळजी घ्यावी.
- पक्ष्यांचे जंतनिर्मूलन करून घ्यावे. शेड उंचावर असावे व शेडभोवती खड्डे पडून पाणी साठून दलदल होणार नाही याची काळजी घ्यावी.

# रिमझिम पावसामुळे हळद पिकावर रोगांचा प्रादुर्भाव!



**सध्या हळद लागवड होऊन तीन ते चार महिन्यांचा कालावधी पूर्ण झाला आहे. सध्या हळद पिकाची शाकीय वाढ होण्याचा कालावधी असून, खोड व फुटव्यांची वाढ भरपूर होते. सतत पावसाची रिमझिम सुरू असल्याने वातावरणातील आर्द्रता वाढलेली आहे. या वातावरणामध्ये रोगांचा प्रादुर्भाव वाढताना दिसतो.**

## कंदकूज गड्डे कुजव्या

**बुरशीजन्य रोग असलेल्या कंदकूज गड्डे कुजव्याला रायझोम रॉट असेही म्हणतात. भरपूर पाऊस, भारी काळी कसदार व कमी निचरा होणारी जमीन या रोगास पोषक असते. ऑगस्ट ते सप्टेंबर या कालावधीत रोगाचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणात होत असतो.**

- लक्षणे : कंदाच्या कोवळ्या फुटव्यावर लक्षणे त्वरित दिसतात. नवीन आलेल्या फुटव्याची पाने पिवळसर तपकिरी रंगाची होतात. खोडाचा रंग तपकिरी काळपट होतो. प्रादुर्भावग्रस्त फुटवा ओढल्यास सहज हातामध्ये येतो. जमिनीत कंद बाहेर काढल्यास तो पचपचीत व मऊ लागतो. त्यातून दुर्गंधीयुक्त पाणी बाहेर पडत असते.
- नियंत्रण : प्रतिबंधात्मक उपाय करताना जैविक बुरशीनाशक ट्रायकोडर्मा प्लस प्रतिएकरी २ ते २.५ किलो पावडर २५० ते ३०० किलो शेणखतामध्ये मिसळून जमिनीत पसरवून द्यावी. रोगाची तीव्रता जास्त असल्यास, हळदीच्या बुंध्याभोवती आळवणी प्रतिलिटर पाणी कॉपर ऑक्सिक्लोराइड ५ ग्रॅम करावी. आळवणी करताना जमिनीस वाफसा असावा. आळवणी केल्यानंतर पिकास थोडासा पाण्याचा ताण द्यावा. गरज वाटल्यास पुन्हा एकदा आळवणी करावी. फवारणी प्रतिलिटर पाणी : कार्बेन्डाझीम (५० डब्ल्यू. पी.) १ ग्रॅम किंवा मॅन्कोझेब २.५ ग्रॅम. अशी असावी. द्रावणात उच्च प्रतीचे चिकट पदार्थ (स्टिकर) १ मि.ली. प्रतिलिटर पाणी मिसळून फवारावे. पावसाळ्यात शेतामध्ये पाणी साचू नये, यासाठी चर घ्यावा. पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होईल, याकडे लक्ष द्यावे.

## पानांवरील ठिपके (करपा/लिफ स्पॉट)

**करपा बुरशीजन्य रोग असून, कोलेटोट्रिकम कॅपसिसी बुरशीमुळे होतो. वातावरणात सकाळी धुके व दव पडत असताना या रोगाचा मोठ्या प्रमाणात प्रादुर्भाव होतो. सप्टेंबर ते नोव्हेंबर या कालावधीमध्ये रोगाची तीव्रता जास्त असते.**



- लक्षणे : अंडाकृती, लंबगोलाकार तपकिरी रंगाचे ठिपके पानावर पडतात. पान सूर्याकडे धरून पाहिल्यास ठिपक्यांमध्ये अनेक वर्तुळे दिसतात. रोगाची तीव्रता वाढल्यास संपूर्ण पान करपते. वाळून गळून पडते.
- नियंत्रण : फवारणी प्रतिलिटर पाणी : मँकोझेब २ ते २.५ ग्रॅम किंवा कॉपर ऑक्सिक्लोराइड २.५ ते ३ ग्रॅम. जास्त दिवस धुके राहिल्यास, पुढील फवारणी बुरशीनाशक बदलून १५ दिवसांच्या अंतराने करावी.

## पानांवरील ठिपके (लिफ ब्लॉच)

**पानांवरील ठिपक्यांचा रोग टॅफ्रिना मॅक्युलन्स या बुरशीमुळे होतो. आर्द्रता वाढल्यास प्रादुर्भाव होतो.**

- लक्षणे : पानांवर अनेक लहान तांबूस रंगाचे गोलाकार ठिपके तयार होतात. पुढे ते वाढत जाऊन संपूर्ण पान करपते. पानाच्या खालील भागावर मुख्य शिरेच्या बाजूने लालसर करड्या रंगाचे १ ते २ सें.मी. व्यासाचे ठिपके दिसतात. त्यामुळे पाने वाळतात. रोगाची सुरुवात जमिनी लगतच्या पानांवर होऊन नंतर रोग वरील पानांवर पसरतो. हळदीची पाने शेंड्याकडून पिवळी दिसायला लागतात.
- नियंत्रण : रोगग्रस्त पाने वेचून नष्ट करावीत. शेतात स्वच्छता ठेवावी. फवारणी प्रतिलिटर पाणी : कार्बेन्डाझीम १ ग्रॅम किंवा मँकोझेब २.५ किंवा कॉपर ऑक्सिक्लोराइड २.५ ग्रॅम. प्रादुर्भावाचे प्रमाण लक्षात घेऊन पुढील फवारणी १० दिवसांच्या अंतराने बुरशीनाशक बदलून करावी.

### रोग नियंत्रणासाठी महत्त्वाच्या बाबी

- हळद पिकात पाणी साचू देऊ नये. वेळोवेळी चर काढून साचलेल्या पाण्याचा निचरा करावा.
- लागवडीसाठी निरोगी बियाणे वापरावे.
- लागवडीपासून ६ ते ७ महिन्यांनी जातीनुसार थोड्याफार प्रमाणात फुले येतात. ही फुले दांड्यासहीत काढावीत. फुले काढल्यामुळे पूर्ण अन्नपुरवठा कंदाला मिळतो. त्यामुळे कंद पोसण्यास मदत होते.
- शिफारशीत वेळेत हळदीची भरणी करावी. त्यामुळे रोग-किडींपासून हळद पिकाचा बचाव होतो.
- हळदीनंतर परत हळद किंवा आले यासारखी पिके सलग त्याच क्षेत्रामध्ये घेऊ नयेत. पिकांचा फेरपालट करावा.
- कंदमाशीचा प्रादुर्भाव असलेल्या ठिकाणी शक्यतो सर्व शेतकऱ्यांनी मिळून कमीत कमी २ ते ३ वर्षे सामुदायिकपणे कंदमाशीचे नियंत्रण करावे.



## शॉर्ट न्यूज

### बेलापूर ते बदगी रस्त्याचे काम लवकरच पूर्ण होणार

**अकोले :** मतदारसंघातील बेलापूर ते बदगी रस्ता सुधारण्यासाठी ८० लाख तसेच बेलापूर पवारवाडी फाटा ते पवारवाडी रस्ता सुधारण्यासाठी ४० लाख रुपयांचा निधी मंजूर झाल्याची माहिती आमदार डॉ. किरण लहामटे यांनी एका कार्यक्रमात दिली. या रस्त्याचे काम लवकरच मार्गी लागणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. कार्यक्रमास राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष शरद चौधरी, मनोज मोरे, राष्ट्रवादी युवक तालुकाध्यक्ष अक्षय आभाळे, मार्केट कमिटीचे संचालक सचिन आरोटे यांच्यासह ग्रामस्थ, कार्यकर्ते, पदाधिकारी, अधिकारी उपस्थित होते.

### हरेगाव येथे मोफत शिबिरास प्रतिसाद

**हरेगाव :** येथे ग्रामपंचायत व युनिटी आय हॉस्पिटल यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर पार पडले. बाजारतळ येथे शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी मोतीबिंदू, डोळ्यातून पाणी येणे, चक्कर येणे, डोळ्यात पडदे येणे, धूरकट दिसणे, लाली, टिक असणे, काच बिंदू, डोळ्यांमधील तिरळेपणाची तपासणी आदी विकारांवर मोफत तपासणी करण्यात आली. डॉ. निलम अग्रवाल यांनी रुग्णांची तपासणी केली. फेको मशीनद्वारे शस्त्रक्रिया केली जाणार आहे.

### शहरात प्राणप्रतिष्ठा निमित्त धार्मिक कार्यक्रम

**राहुरी :** आयोध्या येथे झालेल्या राम मुर्ती प्राण प्रतिष्ठा सोहळा संपन्न झाला. त्या निमित्त राहुरी शहरात विविध ठिकाणी धार्मिक उपक्रम राबविण्यात आले. शहरातील आझाद चौक येथे आझाद तरुण मंडळाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. परिसरात भगवे झेंडे व पताका लावण्यात आल्या होत्या. तसेच उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महाआरती करण्यात आली. नंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी बाल गोपालांनी श्रीराम, सिता व लक्ष्मण यांची वेषभूषा धारण केली होती. तेच कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरत होते.

### दरेवाडी दोघांवर झोपेत हातोडीने हल्ला

**संगमनेर :** तालुक्यातील दरेवाडी येथील संतोष बाजीराव कारंडे (वय २८) व विशाल तुळशीराम कारंडे (वय १६) या दोघांना झोपेत हातोडीच्या सहाय्याने बेदम मारहाण करण्यात आली. हे दोघेही बेशुद्ध असून विशालच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्याची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यावर शहरातील कुटे हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. संतोष व विशाल यांच्यासह किसन, विलास श्रीराम हे घरात झोपले होते; मात्र दोघांनाच मारहाण झाली. घटनास्थळी हातोडी सापडली. घारगाव पोलीस अधिक तपास करीत आहेत.

### बांधावरून दोन गटात हाणामारी

**शेवगाव :** तालुक्यातील कांबी शिवारात शेतातील बांधाच्या वादावरून दोन गटांमध्ये हाणामारी झाली. या दोन्ही गटाने एकमेकांच्या विरोधात शेवगाव पोलीस स्टेशनला गुन्हे दाखल केले आहे. त्यामध्ये जयश्री दत्तात्रय काटमोरे व पार्वती भाऊसाहेब घोलप या दोन्ही ही महिलांनी फिर्यादी दाखल केला आहे. विवेक दत्तात्रय काटमोरे, पायल दत्तात्रय काटमोरे, जयश्री दत्तात्रय काटमोरे व दत्तात्रय लक्ष्मण काटमोरे यांनी लाथा बुक्क्यांनी व दगडाने मारहाण करून पार्वती घोलप, भाऊसाहेब घोलप व ईश्वर घोलप यांना जखमी केले असे नमूद केले आहे.

# हिंदू धर्माचा गर्व अन् अभिमान!

**■ मराठा आरक्षण मिळाल्यानंतर अयोध्येला जाणार**
**■ मनोज जरांगे पाटील यांची स्पष्टोक्ती**

नगर : प्रतिनिधी

**मराठा समाजाला आरक्षणाचा लाभ मिळाल्यानंतर मी अयोध्येत जाऊन प्रभू श्री रामांचे आशीर्वाद घेईल, असे मराठा आरक्षणावरून सरकारला सळो की पळो करून सोडणाऱ्या मनोज जरांगे पाटलांनी सोमवारी स्पष्ट केले. यावेळी अहमदनगर येथील राम मंदिरात दर्शन घेऊन त्यांनी आपला आनंद व्यक्त केला.**



मनोज जरांगे पाटील सोमवारी पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, आम्ही अहमदनगरमध्ये भगवान श्री रामाचे आशीर्वाद घेतले. दर्शन केले आणि पूजाअर्चाही केली. आज संपूर्ण भारतवासीयांसाठी आनंदाचा दिवस आहे. अनेक दिवसांच्या प्रतिक्षेनंतर श्री राम अयोध्येत विराजमान होत आहेत.

**श्री रामांना आरक्षणाचे वेगळे साकडे घालू**

आज संपूर्ण भारतात आनंद व उत्साह आहे. आम्हाला हिंदू धर्माचा गर्व व अभिमान आहे. प्रभू श्री रामांना आरक्षणाचे वेगळे साकडे घालू. आज आनंद व्यक्त केला. मराठा समाजाला आरक्षण मिळाल्यानंतर मी निश्चितच अयोध्येला जाऊन त्यांचे दर्शन घेईल. सर्वजण दणादण रेल्वे भरून अयोध्येला जातील, असेही मनोज जरांगे यांनी यावेळी सांगितले.

मनोज जरांगे पाटील यांनी गत २० तारखेला मराठा आरक्षणासाठी मुंबईच्या दिशेने कूच केली आहे. त्यांच्यासोबत मराठा समाजाच्या लाखो नागरिकांचा ताफा आहे. हे आंदोलक ४ दिवसांनंतर मुंबईत पोहोचणार आहेत. मुंबईत जरांगे आझाद मैदानावर आपले उपोषण सुरू करतील. त्यांनी मुंबईत जवळपास ३ कोटी मराठे जमणार असल्याचा दावा केला आहे.

## वाचकांच्या लेखणीतून

### विरोधी पक्षांनी विचारमंथन करावे



२२ जानेवारी सोमवार रोजी अयोध्येत श्रीराम मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा गाजावाजात आणि थाटामाटात पार पडला. श्रीराम मंदिराचा हा घाट केवळ देशात होऊ घातलेल्या निवडणुकांना अनुसरून होता. असा आरोप विरोधी पक्षांकडून मांडण्यात आला. हे मान्य केले तरी पाचशे वर्षांपासून रामजन्मभूमीची रखडलेली समस्या भारतीय जनता पक्षाच्या म्हणा अथवा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या प्रयत्नांमुळेच म्हणा धसास लागलेली आहे. हे मान्य करावेच लागेल. विरोधी पक्षांनी ही धमक पूर्वीच का दाखवली नाही? ती विद्यमान सरकारने दाखविली! आता विरोधी पक्षांनी याचे विचारमंथन करावे. राजकारण करू नये.

**काबा-ओ-काशी को कुछ नज़दीक लाने के लिए।**
**मैं भटक रहा हूं पुल बनाने के लिए।।**

हे दीर्घ काळापासून आणि खूपदा हे झाले. आता तरी काही बोध घेऊया यातून? पैगंबरवासी उस्ताद बिस्मिल्ला ख़ान म्हणत, कुछ करके दिखा तब मानूं. मतलब कुछ करतब दिखा तो मानूं. विद्यमान सरकारने ते करतब सिध्द करून दाखविलेले आहे. म्हणून विद्यमान भाजप सरकारला आपण या ऐतिहासिक घटनेचे श्रेय आणि धन्यवाद दिलेच पाहिजेत.

**नाना ढवळे,** ८२८६९१३२२३
**निघोज, ता. पारनेर, जि. अहमदनगर.**

# सरकारच्या उदासीनतेबाबत न्यायालयाची ताकीद

**। उच्च न्यायालयाची राज्य शासनाला दोन आठवड्याची मुदत । गुरूद्वारा बोर्ड निवडणूक प्रकरण**

नांदेड : प्रतिनिधी

**सचखंड गुरुद्वारा बोर्ड निवडणूक घेण्यासंदर्भात दाखल मूळ याचिका व न्यायालयाच्या अवमान संदर्भात राज्य शासनाकडून समाधानकारक खुलासा मिळत नसल्याने व निवडणूक प्रक्रिया घेतली जात नसल्याने उच्च न्यायालयाने राज्य सरकारला निवडणूक संदर्भात दोन आठवड्यात नियोजन करण्याचा इशारा दिला असून अन्यथा या विरोधात अवमान याचिका मान्य करून मुख्य सचिवांवर रीतसर खटला चालविण्यात अशी ताकीद दिली आहे.**



गुरुद्वारा सचखंड बोर्ड निवडणूक घेण्यासंदर्भात जगदीपसिंग नंबरदार यांनी याचिका क्रमांक-१००५/२०२२ दाखल केली होती. परंतु तीन महिन्याच्या मुदतीत निवडणूक प्रक्रिया पार पाडण्याचे आदेश देऊनही त्यावर कोणतीही कारवाई होत नसल्याने नंबरदार यांनी अवमान याचिका-५११/२०२ दाखल केली आहे. सदर याचिकेवर दि. १८ जानेवारी २०२४ रोजी उच्च न्यायालयाचे छत्रपती संभाजीनगर खंडपीठ न्यायमूर्ती मंगेश पाटील व शैलेश ब्रम्हे यांच्यासमोर सुनावणी सुरू आहे. याचिकाकर्त्यांची बाजू ॲड. मृगेश नरवाडकर यांनी मांडली असता.

न्यायालयाने वारंवार आदेश देऊनही निवडणूक घेण्यासंदर्भात भाटिया समितीच्या अहवालाचे कारण दाखवून वेळखाऊ भूमिका घेत आहे. यामध्ये राज्य शासनाची उदासीनता दिसत असल्याने न्यायालयाने महसूल विभागाचे मुख्य सचिवांना निवडणूक घेण्यासंदर्भात दोन आठवड्यामध्ये नियोजन करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशांची अंमलबजावणी बाबत सकारात्मक पावले न उचलल्यास न्यायालयात अवमान याचिका मान्य करून रीतसर खटला चालविण्याचा आदेश दिले आहेत. या आदेशामुळे राज्य सरकार चांगलेच अडचणीत आले असून निवडणूक प्रक्रिया सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असल्याचे बोलल्या जात आहे.

# मिशन सर्वेक्षण मोहिमेच्या अंमलबजावणीस सुरुवात

**■ महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील ■ महसूल विभागाची संपूर्ण यंत्रणा सज्ज**

मुंबई : प्रतिनिधी

**राज्यभरात राज्य मागासवर्ग आयोगाकडून करण्यात येत असलेल्या मराठा व खुल्या प्रवर्गासाठी मिशन सर्वेक्षण मोहिमेस प्रत्यक्षात दि. २३ जानेवारी) पासून सुरुवात होत आहे. यासाठी संपूर्ण महसूल यंत्रणा सज्ज आहे. याबाबत विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत, त्याप्रमाणे सर्व यंत्रणांनी या कामाला सर्वोच्च प्राधान्य देऊन कालबद्धरितीने अचूक सर्वेक्षण करावे असे निर्देश देण्यात आल्याची माहिती राज्याचे महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली. तसेच या कालावधीत नागरिकांनी देखील अचूक माहिती देवून सर्वेक्षणास सहकार्य करावे असेही आवाहन त्यांनी केले आहे.**



मराठा आरक्षणासंदर्भात समाजाचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी राज्य मागासवर्ग आयोगाकडून मिशन सर्वेक्षण मोहिम राबिण्यात येत आहे. २३ ते ३१ जानेवारी दरम्यान ३६ जिल्हे, २७ महानगरपालिका आणि ७ अर्ध सैनिक वसाहती (कॅन्टॉन्मेंट बोर्ड) यामध्ये हे सर्वेक्षण होणार आहे.

गावनिहाय घरोघरी जाऊन सर्वेक्षणाची जबाबदारी प्रगणक व पर्यवेक्षक यांच्यावर सोपविण्यात आली आहे. त्यासाठी राज्यभरातील एकूण १ लाख २५ हजार पेक्षा अधिक प्रगणक, पर्यवेक्षक व अधिकारी नियुक्ती करतानाच, त्यांना प्रशिक्षित करण्यात आलेले आहे. याशिवाय महसूल व सामान्य प्रशासन विभागाचे सचिव व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली ही संपूर्ण सर्वेक्षण प्रक्रिया राबविण्यात येत आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या दृष्टीने पोलीस यंत्रणा, पोलीस पाटील व गृहरक्षक दलाचीही मदत घेतली जाणार आहे.

प्रत्येक जिल्ह्यासाठी जिल्हाधिकारी, तर महानगरपालिका क्षेत्रासाठी आयुक्त हे नोडल अधिकारी म्हणून जबाबदारी पाहत आहेत, असे मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

**रियल टाइम मॉनिटरिंग**

मिशन सर्वेक्षण मोहीम ही डिजीटल स्वरूपात असल्याने याच्या नोंदी थेट राज्य मागासवर्ग आयोगाकडे जमा होणार आहेत. तसेच यासाठी प्रत्येक तालुक्याला मदत कक्ष आणि जिल्हयाच्या ठिकाणी डॅश बोर्डच्या माध्यमातून या संपुर्ण सर्वेक्षणावर जिल्हाधिकारी लक्ष ठेऊन असतील. शिवाय त्या अचूक नोंदी आणि आकडेवारी राज्य मागासवर्ग आयोगाच्या तज्ञांमार्फत वेळोवेळी तपासल्या जाणार आहेत.

**दिड लाख कुणबी दाखल्यांचे वितरण**

यासोबतच निवृत्त न्या, संदीप शिंदे यांच्या समितीने काम सुरु केल्यापासून महसूल विभामार्फत २८ ऑक्टो ते १७ जानेवारीपर्यंत ५७ लाख नोंदी शोधण्यात आल्या आहेत. तसेच आतापर्यंत तब्बल १ लाख ५० हजार कुणबी दाखले वितरित करण्यात आल्याचेही मंत्री विखे पाटील यांनी सांगितले.

(पान १ वरून)

## ... तर पुन्हा रामराज्य निर्माण होईल!

पद्मश्री पवार यांनी अयोध्येत जाऊन प्रभू रामचंद्राच्या चरणी लिन होवून दर्शन घेतल्यानंतर ते पारनेर दर्शनशी बोलत होते. पद्मश्री पोपटराव पवार म्हणाले की, असा अभूतपूर्व सोहळा मी माझ्या उभ्या आयुष्यात पहिल्यांदाच अनुभवला या सोहळ्यात संत महंत, सर्व आखाड्यातील सर्व प्रमुख साधू, उद्योग, सिने, न्याय क्षेत्रासहीत सर्वसामान्य व्यक्ती एकत्रित आल्याचे पहिल्यांदाच पाहिले. अत्यंत शिस्तबध्द रीतीने हा सोहळा साजरा झाला. प्रभू श्रीरामांचे वास्तव्य हे नद्यांच्या आणि वनांच्या नैसर्गिक सानिध्यात होते आणि त्यात साधन संपत्तीचे संरक्षण करणे समाजाचे कल्याण करणे ही आपली जबाबदारी आहे.त्या काळात हनुमंतांनी द्रोणागिरी पर्वतावरून संजीवनी बुटी आणल्याचा उल्लेखही करताना पद्मश्री पवार म्हणाले की, राम राज्यात जनता, पशुपक्षीही आनंदी होते आणि हीच रामराज्याची पंतप्रधान मोदी यांची संकल्पना उद्याच्या काळात साकार होण्याची आवश्यकता आहे.यामुळे राज्यकर्त्यांचीही नैतिक जबाबदारी वाढल्याचेही त्यांनी सांगितले

## मला दगाफटका झाला तरीही तुम्ही आरक्षणाचे आंदोलन चालू ठेवा !

देऊनही सकारात्मक विचार करत नाही मराठा समाज गोंधळलेल्या अवस्थेत आहे त्यामुळे सध्या ''करो वा मरो'' अशी वेळ आली आहे, अशी परिस्थिती सध्या मराठा आरक्षणाच्या संदर्भात निर्माण झाली असून, कोणत्याही परिस्थितीत मराठा समाजाला आरक्षण मिळाल्याशिवाय आपण माघार घेणार नाही,'' असा इशारा मनोज जरांगे यांनी दिला.

या वेळी जरांगे म्हणाले, ''राज्यात ५४ लाख कुणबी नोंदी सापडल्या, अजूनही कुणबी नोंदी आढळून येत आहेत. मात्र तरीही सरकार मराठा समाजाला आरक्षण देत नाही. आपल्याला आणखी वेळ द्यावा, असे शासन म्हणत असले, तरीही या पूर्वी सात महिन्यांचा अवधी देऊनही मागणी मान्य केलेली नाही व प्रमाणपत्रेही दिलेली नाहीत. सरकार वेळकाढूपणा करीत आहे.'

ते म्हणाले, 'राज्यभरातील तमाम मराठ्यांच्या मतांच्या जिवावर यांनी राजकारण केले. आता आपल्याला घेण्याची वेळ आली आहे. कुठल्याही परिस्थिती मागे हटणार नाही. पण आरक्षण घेऊनच मुंबई सोडणार, आता आरक्षण दिले नाही, तर यांना सळो की पळो करून सोडा व त्यांना त्यांची जागा दाखवून द्या. मी सरकारला मॅनेज होत नसल्याने सरकारची अडचण झाली आहे. तुमची एकजूट अशीच आबादीत ठेवा.'

यावेळी कारेगाव रांजणगाव व तालुक्यातील सर्व बांधवांच्या वतीने सभेचे अतिशय नेटके आणि काटेकोर नियोजन करण्यात आले होते. यांना सभास्थळी येण्यास सहा तास उशीर झाला. रात्री अडीचच्या सुमारास सभास्थळी त्यांचे आगमन झाले. यावेळी मराठा आंदोलकांनी परिसर दुमदुमून सोडला. व्यासपीठावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला अभिवादन करून जरांगे पाटील यांनी आपले भाषण सुरू केले.

## अयोध्येत लोटला रामभक्तांचा महापूर

येथून केवळ पासधारक, आपत्कालीन सेवा रुग्णवाहिका, परीक्षार्थी, शेतकऱ्यांना डिझेल, पेट्रोल, दूध, भाजीपाला, गॅस सिलिंडर यासारख्या जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा करणारी वाहने यांची तपासणी आणि खातरजमा केल्यानंतरच सोडण्यात येत आहेत. भगवे झेंडे घेऊन येणाऱ्या वाहनांना अयोध्येत प्रवेश दिला जात नाही. अयोध्येतील भाविकांची गर्दी रोखण्यासाठी दुहेरी बंदोबस्तात कडेकोट पोलीस बंदोबस्त लावण्यात आला आहे.दरम्यान मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ देखील तडकाफडकी अयोध्येत दाखल झाले आहेत. अयोध्येत भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. गर्दीचे योग्य नियोजन न केल्यामुळे मुख्यमंत्री अधिकाऱ्यांवर नाराज आहेत. त्यांनी हेलिकॉप्टरमधून राम मंदीर परिसराची पाहणी केली. सीआरपीएफकडे गर्दी गर्दी नियंत्रणात आणण्यासाठी जबाबदारी देण्यात आली आहे.

# बारामतीला चार वेळा मुख्यमंत्रिपद पण दुर्दैवाने मोठे काम नाही

**अजित पवार यांचा शरद पवार यांच्यावर हल्ला**

बारामती : प्रतिनिधी

**बारामती तालुक्यात अनेक विकासकामे सुरु आहेत. मोठमोठ्या योजना राबविल्या जात आहेत. आजपर्यंतच्या इतिहासात असे काम झाले नाही. आपल्याकडे अनेकदा मोठमोठी पदे आली. चारदा मुख्यमंत्री पद मिळाले, पण अशा योजना आल्या नव्हत्या, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी ज्येष्ठ नेते शरद पवार यांचे नाव न घेता त्यांच्यावर हल्ला चढविला. उंडवडी येथे बारामती कृषी उत्पन्न बाजार समितीने उभारलेल्या पेट्रोल पंप उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.**



अजित पवार म्हणाले, चारवेळा मुख्यमंत्रिपद आणि अन्य महत्त्वाची पदे आल्यानंतर सुद्धा बारामतीत इतके काम झाले नव्हते. दुर्दैवाने मोठ्या योजना मंजूर होऊ शकल्या नव्हत्या. मी मात्र त्यात जातीने लक्ष घातले. एकट्या बारामतीत कृषी उत्पन्न बाजार समितीचे ६५ कोटींची कामे सुरु आहेत, वस्त्रोद्योग मंडळाकडून ९ कोटी रुपये मंजूर केले आहेत. बारामती बाजार समितीचा सेस फंड किती आहे, इतर बाजार समित्यांची अवस्था आज काय आहे, याची जरा माहिती घ्या, असे सांगून पवार म्हणाले, समितीने सुप्यात जागा घेतली. परंतु ती खड्ड्यात होती. तेथील तलावाचे खोलीकरण करत असताना ती जागा भरून काढली. सुपा व सुपा परगणा परिसरातील गावांमध्ये रस्ते, पिण्याच्या पाण्याच्या योजना याची १ हजार कोटींची कामे सुरु आहेत. लोकांचा यावर विश्वास बसणार नाही. एका आमदाराला वर्षाला पाच कोटींचा निधी मिळतो, इथे हजारो कोटींची कामे सुरु आहेत.

**मला अनमोल साथ दिली, बारामतीकरांनो आभार!**

सुदैवाने तुम्हा सगळ्यांनी मला ३०-३२ वर्षे राजकीय जीवनात साथ दिली. खासदार, आमदार, राज्यमंत्री, मंत्री, उपमुख्यमंत्री, विरोधी पक्षनेता अशी पदे त्यातून मिळाली. मला त्या अनुभवातून बऱ्याच गोष्टी समजल्या. कोणकोणत्या विकासकामांसाठी कसा पाठपुरावा करायचा, कशा प्रकारे निधीची तरतूद करायची, बजेटमध्ये कामे कशी घालायची, पुरवणी मागणीतून निधी कसा आणायचा हे मला समजले. त्यातून अल्पसंख्यांक, मागासवर्गीय, भटक्या समाजाला, बेघर लोकांसाठी घर बांधणी कार्यक्रम आदींसाठी भरीव निधी आणला असल्याचे ते म्हणाले.

**...तर नावाचा अजित पवार नाही!**

रविवारीच एका कंपनीच्या सीएसआर फंडातून ६० रुग्णांच्या डायलिसिसची सुविधा उपलब्ध करून दिली आहे. बारामतीतील सिल्व्हर ज्युबिली उपजिल्हा रुग्णालयाच्या वरच्या मजल्यावर ही सेवा दिली जात आहे. मेडिकल कॉलेजमध्ये रुग्णांवर चांगले उपचार होत असल्याच्या नागरिकांच्या प्रतिक्रिया येत आहेत. मेडदला म्हाडाची जागा वेढ्या बाभळींनी वेढली होती. तिथे आपण आयुर्वेद कॉलेजची भव्य इमारत उभी करत आहोत. ते पूर्ण झाल्यावर आपण मेडदमध्ये आहोत की कुठे? असे लोक म्हटले नाहीत तर नावाचा अजित पवार नाही असेही पवार म्हणाले.

# बच्चन-तेंडुलकरनंतर मनोज जरांगेंचा मेणाचा पुतळा

**मावळच्या तरुणाकडून ३ महिन्यात उभारणी**

लोणावळा : प्रतिनिधी

**लोणावळ्याच्या वॅक्स म्युझियममध्ये देशात लोकप्रिय असणाऱ्या व्यक्तींचे पुतळे बनविण्यात येतात. त्यात अमिताभ बच्चन, सचिन तेंडुलकर अशा अनेक दिग्गजांचे मेणाचे पुतळे बनवण्यात आले आहेत. मात्र गेल्या काही महिन्यापासून मराठा समाजाच्या आरक्षणासाठी दिवस रात्र एक करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांचा देखील मेणाचा पुतळा बनविण्यात आला आहे. समाजासाठी जरांगे एवढे मोठे कार्य करत आहेत. त्यात आपलाही खारीचा वाटा असावा अशी आस मनाशी बाळगून मावळ तालुक्यातील एका तरुणाने हा मेणाचा पुतळा बनवला आहे.**



मराठा समाजाला आरक्षण मिळावे यासाठी मनोज जरांगे पाटील आंतरवाली सराटीतून मुंबईच्या दिशेने निघाले आहेत. पुणे जिल्ह्यातील त्यांचा शेवटचा मुक्काम लोणावळा येथे होणार आहे. त्यामुळे त्यांच्या आंदोलनाची जय्यत तयारी करण्यात येत आहे. त्यात मावळ तालुक्यातील अशोक माळसकर या मराठा तरुणाने हा पुतळा बनवला आहे. अवघ्या तीन महिन्यात हा पुतळा साकारण्यात आला आहे. मनोज जरांगे पाटील यांच्या या आंदोलनाची इतिहासात नोंद व्हावी यासाठी मावळ तालुक्यातील कार्ला या ठिकाणी हा पुतळा उभारण्यात आला आहे.

# किरण श्रीमंदिलकरला जामीन मंजूर

## औरंगाबाद खंडपीठाचा निर्णय



औरंगाबाद : प्रतिनिधी

**पारनेर शहरात कारने चिडून माय लेकरांचा खून केल्यापकरणी पारनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असलेल्या किरण राजाराम श्रीमंदिलकर यास मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जामीन मंजूर केला आहे. या गुन्हाप्रकरणी न्यायालयात दोषारोपपत्र दाखल होण्यापूर्वीच न्यायालयाने किरण यास जामीन मंजुर केला आहे.**

दि.२४ नोव्हेंबर रोजी किरण श्रीमंदिलकर याने माय लेकरांचा कारने चिडून खून केल्याप्रकरणी चंद्रकला शिवाजी येणारे यांनी फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीवरून आरोपी किरण याच्याविरोधात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्हयाप्रकरणी किरण यास पारनेर पोलीसांनी अटक केल्यानंतर आरोपी किरण याचे वकील ॲड. तुषार हिलाळ व ॲड. अभिजित खांडरे यांनी नगरच्या सत्र न्यायालयात जामीनासाठी अर्ज दाखल केला होता. परंतू या गुन्हयात आरोपीचा प्रथम दर्शनी सहभाग असल्याचे सांगत सत्र न्यायालयाने जामीन अर्ज फेटाळला होता.

सत्र न्यायालायाने जामीन फेटाळल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडीपीठामध्ये वकील हिलाळ खांडरे यांनी अर्ज दाखल केला. आरोपीची बाजू मांडताना जमिनीच्या जुन्या वादाबाबत कोणताही कागदोपत्री पुरावा फिर्यादीच्या वतीने न्यायालयासमोर सादर केलेला नाही. घटनेनंतर आरोपीने स्वतः आई व मुलास दवाखान्यात दाखल केल्याची बाब न्यायालच्या निदर्शनास आणून दिली. फिर्यादी वेळोवेळी जबाब बदलत असल्याचे तसेच दबावापोटी पोलीसांनी हा गुन्हा दाखल केल्याचे वकिलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. आरोपीविरोधात खुनाचा चुकीचा गुन्हा दाखल केल्याचे तसेच हा अपघात असल्याचेही वकीलांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. सरकार पक्षाच्या वतीने दुहेरी हत्येचा गंभीर स्वरूपाचा हा गुन्हा असून आरोपी याने जाणीवपुर्वक, दुष्ट हेतूने मयतांचा खुन केला आहे व हा अपघात असल्याचे दर्शविण्यात येत आहे. आरोपीने गुन्हा करण्यापूर्वी मित्रांसोबत मद्यप्राशन केले होते. गुन्हा घडल्यानंतर आरोपी फरार झाला होता.

आरोपीविरोधात अद्याप न्यायालयात दोषारोपपत्र दाखल नसल्याने त्याची जामीनावर मुक्तता करण्यात येउ नये अशी बाजू सरकार पक्षातर्फे मांडण्यात आली. फिर्यादी यांनी आरोपी व त्यांचे वडील यांची पारनेर परिसरात दहशत असल्याची व फिर्यादी व आरोपी शेजारी राहत असल्याने फिर्यादी व त्यांच्या परिवारास आरोपीकडून धोका असल्याची बाजूही मांडण्यात आली. न्यायालयाने आरोपींच्या वकीलांचा युक्तीवाद मंजुर करून दि.२२ जानेवारी रोजी किरण यास जामीन मंजुर केला.

# रामराज्यातील ग्रामराज्य हिवरे बाजारने उभे केले

## ह.भ.प.यशवंत महाराज थोरात

हिवरे बाजार : प्रतिनिधी

**श्रीराम लल्ला मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा अयोध्या निमित्ताने दिनांक २२ जानेवारी २०२४ रोजी आदर्श गाव हिवरे बाजार येथे विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.सकाळी कृष्णकृपांकित ह.भ.प.विकासानंद महाराज मिसाळ यांचे हस्ते श्रीरामांचा ध्वजारोहण, त्यांनतर श्रीरामप्रभू रामचंद्रांच्या जयघोषात संपूर्ण गाव प्रदक्षिणा आणि त्यानंतर कीर्तन ,आरती, स्नेहभोजन व रात्री भजन संगीत झाले.**



ह.भ.प.यशवंत महाराज थोरात यांनी कीर्तनात ग्रामस्थांना संदेश देताना सांगितले, रामराज्यातील ग्रामराज्य साक्षात हिवरे बाजारने उभे केले आहे. प्रभू रामांचा वनवासात जास्त काळ गेला त्यामुळे त्यांना वनात पशु, पक्षी, प्राणी, वन्यजमाती, नद्या या सर्वांना बरोबर घेऊन रामराज्य उभे केले.प्रभू रामांच्या राज्यात पाणी हि कुठलीही समस्या नव्हती.आणि त्याच प्रकारचे ग्रामराज्य हिवरे बाजारने उभे केले आणि ते उभे करणारे तुमचे सरपंच पद्मश्री पोपटराव पवार आज अयोध्येमध्ये साक्षात श्रीरामप्रभू रामचंद्राच्या जन्माचे साक्षीदार आहेत. तुम्ही सर्व भाग्यवान आहात कारण तुम्ही हिवरे बाजार मध्ये जन्माला आलात.१४० कोटीच्या लोकसंख्येत अवघ्या ७००० व्यक्तींना आमंत्रित करण्यात आले.

हे अनेक पिढ्यांचे मागचे पुण्य आणि भविष्यकाळातील कित्येक पिढ्या सूर्य चंद्र असेपर्यंत नावे काढतील.माणूस जन्माला आला कि राम हातात येतो आणि मरताना सुध्दा राम राम म्हणतच जावे लागते.

याप्रसंगी विमलताई ठाणगे सरपंच हिवरे बाजार,छबूराव ठाणगे चेअरमन,रामभाऊ चत्तर व्हा चेअरमन,बाबासाहेब गुंजाळ ,हरिभाऊ ठाणगे(सर),दामोधर ठाणगे ,अर्जुन पवार ,पादीर सर,रोहिदास पादीर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रमसंस्कार शिबिरातून सर्वांगिण विकास

## राहुल रसाळ यांचे प्रतिपादन

निघोज : प्रतिनिधी

**राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांच्या मानात श्रमसंस्काराची बीजे पेरली जाउन त्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास होतो असे प्रतिपादन महाराष्ट्र शासनाचा उद्यान विद्या पुरस्कार प्राप्त प्रगतशिल शेतकरी राहुल रसाळ यांनी केले.**



श्री मुलिकादेवी महाविद्यालयाच्या श्रमसंस्कार शिबिराचे प्रगतशिल शेतकरी राहुल रसाळ यांच्या उपस्थितीत उदघाटन करण्यात आले.

श्री मुलिकादेवी महाविद्यालयाच्या बाभुळवाडे येथे आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन रसाळ यांच्या उपस्थितीत पार पडले त्यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी बाबाजी येवले सरपंच वैशाली जगदाळे, उपसरपंच बाळासाहेब नवले, डॉ. सुरेश खणकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे विशेष कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोहर एरंडे यांच्यासह ग्रामस्थ, प्राध्यापक, विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

यावेळी बोलताना रसाळ म्हणाले, विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाबरोबरच सामाजिक भान निर्माण करणे गरजेचे असते. श्रमसंस्कार शिबिराच्या माध्यमातून गावाच्या विकासाला नवी दिशा मिळण्याबरोबरच सामाजिक संदेशही दिला जातो.

यावेळी बोलताना बाबाजी येवले म्हणाले, राष्ट्रीय सेवा योजना हा विभाग विद्यार्थ्यांवर श्रम संस्कार करणारे केंद्र आहे. तरूण विद्यार्थी हा देशाचा आधारस्तंभ असून तरूणाच्या हाता उद्याच्चया उज्वल भारताचे स्वप्न आहे. हे स्वप्न पुर्ण करण्यासाठी अशा शिबिरांमधून विद्यार्थी घडतात.

प्रा. मनोहर एरंडे म्हणाले, शेतीमध्ये आधुनिक बदल करणारे युवा शेतकरी हे आजच्या विद्यार्थ्यांचे खरे आयडॉल आहेत. पंधारा वर्षांपासून राहुल रसाळ यांनी शेती क्षेत्रामध्ये अधुनिकतेचा वापर करून शेतीला प्रगतीचा मार्ग दाखविला आहे. शासनाने त्यांना अनेक पुरस्कारांनी सन्मानीत करून निघोजचा नावलौकीक रसाळ यांनी राज्यात केला आहे. त्यांचे कुटूंब कष्टळू असून त्यांचे शेतीमधील प्रयोग पाहण्यासाठी राज्यभरातील शेतकरी हजेरी लावतात हा त्यांच्या कामाचा गौरव असल्याचे एरंडे यांनी सांगितले. प्रा. आनंद पाटेकर यांनी सुत्रसंचलन तर प्रा. मनिषा गाडीलकर यांनी आभार मानले.

# १० तोळे सोन्याची चेन ग्राहकास परत ! लॉजमालकाचा प्रामाणिकपणा

पळवे खुर्द : प्रतिनिधी

**लॉजमध्ये मुक्कामी असलेल्या ग्राहकाची बाथरूमध्ये विसरलेली दहा तोळे वजनाची सोन्याची चेन ग्राहकास परत करून पळवेखुर्द येथील मातोश्री लॉजचे मालक रोहिदास नवले यांनी प्रामाणिपणाचे दर्शन घडविले.**



मातोश्री लॉजच्या बाथरूमध्ये विसरलेली सोन्याची चेन ग्राहक शरद बारहाते यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

यासंदर्भात मिळालेल्या माहितीनुसार केशवनगर, चिंचवड येथील शरद बारहाते हे नगर पुणे महामार्गावरून प्रवास करीत असताा रात्रीच्या वेळी पळवे खुर्द येथील मातोश्री लॉज येथे मुक्कामी थांबले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी आंघोळ करताना बारहाते यांनी गळयातील दहा तोळे वजनाची सोन्याची चेन बाथरूमध्ये काढून ठेवली. आंघोळीनंतर बारहाते हे लॉज सोडून निघून गेले.

लॉजमधील खोल्यांची सफाई करताना बारहाते वास्तव्यास असलेल्या खोलीतील बाथरूमध्ये सोन्याची चेन आढळून आली. लॉजचे मालक रोहिदास नवले यांनी शरद बारहाते यांच्याशी संपर्क करून त्यांची चेन लॉजच्या बाथरूमध्ये विसरली असून ती घेउन जावी अशी माहिती दिली.

लॉजमालक नवले यांच्या माहीतीनंतर शरद बारहाते यांनी पुन्हा पळवेखुर्द येथे येऊन नवले यांच्याकडून आपली चेन ताब्यात घेतली. नवले यांच्या प्रामाणिकपणाचे कौतुक करीत पळवे परीसरातील नागरीकांनी नवले कुटूंबाचा प्रामाणिकपणा पुन्हा एकदा अधोरेखीत झाल्याची प्रतिक्रीया दिली. मातोश्री लॉजचे मालक रोहिदास नवले, सैनिक बँकेचे माजी व्हा. चेअरमन तथा संचालक संयज तरटे, सरपंच प्रसाद तरटे, विविध कार्यकारी सेवा संस्थेचे चेअरमन अंबादास तरटे, उद्योजक अविनाश ढोरमले, तंटामुक्तीचे अध्यक्ष बाबासाहेब इरकर, उद्योजक अमोल शेळके आदी यावेळी उपस्थित होते.



**जरांगे पाटलांनी घेतलं! महागणपतीचं दर्शन**

यावेळी रांजणगाव गणपती देवस्थानच्या वतीने विश्वस्तांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



# पालकमंत्री विखे पाटलांच्या हाती झाडू ! कोरठण खंडोबा मंदिर परिसरात स्वच्छता

पिंपळगाव रोठा : प्रतिनिधी

**श्रीराम जन्मभूमी आयोध्या प्राणप्रतिष्ठा निमित्त भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून देशभर स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. नगर जिल्ह्याचे पालकमंत्री व राज्याचे महसूल मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते श्रीक्षेत्र कोरठाण खंडोबा या ठिकाणी देवाची महाआरती व मंदिर परिसरामध्ये स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.**

यावेळी कार्यकर्त्यांशी मंत्री विखे पाटील यांनी संवाद सुद्धा साधला ते म्हणाले अयोध्या या ठिकाणी राम मंदिर व्हावे म्हणून संघर्षमय वाटचालीतून अनेक लोकांच्या प्रयत्नातून कार सेवकांच्या बलिदानातून अनेक भक्तांनी समर्पित भावनेतून काम केलं सगळ्यांच्या एकत्रित यशाचा परिणाम म्हणजेच आयोध्याला राम मंदिरात राम लल्लाची स्थापना होत आहे ही आपल्या सर्वांसाठी ऐतिहासिक घटना म्हटली पाहिजे.

कोरठण खंडोबा देवस्थानच्या विकासासाठी यापूर्वीही निधी उपलब्ध करून दिला आहे. देवस्थानच्या पुढील काळात विकासासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले

यावेळी मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या स्वागतासाठी अहमदनगर दक्षिणचे भाजप जिल्हाध्यक्ष दिलीप भालसिंग, पारनेर भाजप तालुका अध्यक्ष राहुल पाटील शिंदे, भाजपचे नेते विश्वनाथ कोरडे, काशिनाथ दाते सर, बाबासाहेब तांबे, अहमदनगर भाजपा महिला जिल्हाध्यक्ष अश्विनीताई थोरात, शिवसेना तालुकाध्यक्ष विकास उर्फ बंडू रोहोकले, कोरठण खंडोबा देवस्थानचे माजी अध्यक्ष पांडुरंग गायकवाड, माजी पंचायत समिती सदस्य राजेंद्र चौधरी, ज्येष्ठ पत्रकार शिवाजीराव शिर्के, पारनेर तालुका खरेदी-विक्री संघाचे चेअरमन ॲड. बाबासाहेब खिलारी, व्हा. चेअरमन गंगाधर रोहकले, कोरठण देवस्थानचे अध्यक्ष शालिनी घुले, उपाध्यक्ष महेश शिरोळे, भाजप नेते सुभाष दुधाडे, वसंत चेडे, दिनेश बाबर, पारनेर भाजपा युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष पंकज कारखिले, देवस्थानचे जालिंदर खोसे, भाजप नेते सुनील थोरात, किरण कोकाटे, शिवाजी खिलारी, डॉ. भाऊसाहेब खिलारी, संजय मते, पिंपळगाव रोठा सरपंच सुरेखा वाळुंज, चंद्रकांत कुलकर्णी, सुपा मा. उपसरपंच दत्ता नाना पवार, वडनेर हवेली सरपंच लहू भालेकर, भरत गट, ज्येष्ठ नेते सुभाष गांधी, संतोष शेलार, ॲड. संतोष वाळुंज, सोनालीताई सालके, अंजनाताई बांडे, किसन धुमाळ, अण्णा पाटील नरसाळे, संग्राम पावडे, प्रवीण कारखिले, बाळा कारले, ओमकार मावळे, गणेश चव्हाण, बापूसाहेब रांधवन, सामाजिक कार्यकर्ते योगेश कुलथे, संतोष आंधळे, नितीन आंधळे, अनिल आंधळे, तुषार रोहकले, नामदेव रोहकले, आदी यावेळी उपस्थित होते.

# विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन उत्साहात

पारनेर : प्रतिनिधी

**अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाजाचे, न्यू आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पारनेर राष्ट्रीय सेवा योजनेच्या पुणेवाडी येथे आयोजित विशेष श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त सीताराम विठ्ठलराव खिलारी यांच्या अध्यक्षतेखाली आणि मारुती रेपाळे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले.**

यावेळी बोलताना पारनेर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा. संचालक मारूती रेपाळे म्हणाले की, माझा आणि या महाविद्यालयाचा केवळ मी पुणेवाडीचा एक ग्रामस्थ म्हणून संबंध नाही तर अगदी माझ्या शिक्षणापासून आहे. महाविद्यालयाच्या अशाच अनेक उपक्रमातून आपल्याला सामाजिक भान येत असते. याठिकाणी आयोजित या श्रमसंस्कार शिबिरातून नक्कीच एक नवा अनुभव घेऊन विद्यार्थी जातील.

यावेळी अध्यक्षीय भाषण करताना सीताराम खिलारी म्हणाले की, आपल्या महाराष्ट्रात अध्यात्माची एक परंपरा आहे. आपल्या संत महात्म्यांनी भक्तीची महती सांगताना कर्माचेही महत्त्व प्रतिपादन केलेले आहे. संत ज्ञानेश्वरांपासून ते संत सावता माळी आणि पारनेरच्या संत निळोबारायांपर्यंत सर्वांनी कर्ममय भक्तीचाच उपदेश केलेला आहे. आपल्या कामातच देवाची पूजा आहे असे सांगणारे अनेक संत होऊन गेले. त्यामुळे, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थ्यांना ही एक मोठी संधी आहे. त्यात इथे भक्ती पंढरी भरते. अनेक संत महात्म्यांच्या पदस्पर्शाने ही पुणेवाडी पावन झालेली आहे.

## श्रमसंस्कारातून नवे अनुभव : मारुती रेपाळे



श्री काळभैरवनाथांच्या या पवित्र अशा ठिकाणी या शिबिरातील सहभागी विद्यार्थ्यांना सेवाभाव, कष्ट आणि निष्काम कर्माचे महत्त्व नक्कीच समजेल. ज्ञान व वैराग्य असल्याशिवाय मोठे होता येत नाही. श्रमाला पर्याय नाही. शिक्षणाबरोबरच सामाजिक उपक्रमातून खऱ्या अर्थाने नेतृत्व घडते.


या उद्घाटन कार्यक्रमाचे प्रास्ताविक महविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनी केले. त्यावेळी ते म्हणाले की, एक अष्टपैलू व्यक्तिमत्त्व विकसित होण्यासाठी राष्ट्रीय सेवा योजना श्रमसंस्कार शिबिर महत्वाचे ठरते. सामाजिक एकोप्याचे शिक्षणही त्यांना मिळते. यावेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक, विद्यार्थी विकास अधिकारी,शिक्षक व शिक्षकेतर सेवक वृंद, त्याचप्रमाणे, लोकनियुक्त सरपंच सौ. दिपालीताई मारुतराव रेपाळे, , उपसरपंच प्रशांत सखाराम बोरुडे, चेअरमन भानुदास यशवंत बोरुडे, व्हा. चेअरमन सौ कुसुमताई मोहन शेठ रेपाळे, मा. जयसिंग महाराज बोरुडे, दशरथशेठ बोरुडे, तलाठी, सपना खोचे, ग्रामसेवक दीपक ज्ञानदेव दाते, मुख्याध्यापिका श्रीमती अनिता देशमुख, मुख्याध्यापक मा. श्री रामनाथ आवारी भैरवनाथ विद्यालय पुणेवाडीचे सरपंच, उपसरपंच, तलाठी, गावातील सर्व मान्यवर व ग्रामस्थ उपस्थित होते.

# नगरसह ३० जिल्ह्यात होणारभूमी अभिलेखची अत्याधुनिक सुविधा केंद्र

## आता चकरा मारण्याची गरज नाही

नगर : प्रतिनिधी

**सातबारा उतारा, जमिनीचे रंगीत नकाशे, फेरफार नोंदीचा उतारा आदी कागदपत्रांसाठी आता भूमी अभिलेख विभागांच्या कार्यालयांमध्ये चकरा मारण्याची गरज नाही.सेतू सुविधा केंद्रापेक्षा अत्याधुनिक सुविधा आता भूमी अभिलेख विभागाच्या भू-प्रणाम केंद्रामधून मिळणार आहे. नगरसह राज्यातील ३० जिल्ह्यांमध्ये अशी अत्याधुनिक केंद्रे उभारण्यात येत आहेत. येत्या एप्रिलपासून ही सुविधा केंद्र सुरू होणार आहेत.**




प्रत्येक सुविधा केंद्रासाठी राज्य सरकारने प्रत्येकी दहा लाख रुपयांचा निधी देखील उपलब्ध करून दिला आहे. एसी रूममध्ये हे सुविधा केंद्र संस्थेकडून चालवले जाणार आहे. ही सुविधा घेताना नागरिकांना नाममात्र दरात अर्थात दहा रुपये द्यावे लागणार आहेत. नगर,पालघर, मुंबई उपनगर, ठाणे, रत्नागिरी, नाशिक, मालेगाव, धुळे, नंदूरबार, छत्रपती संभाजीनगर, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, अकोला, वाशिम, यवतमाळ, बुलढाणा, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, पुणे, सातारा, सांगली, सोलापूर, अमरावती, कोल्हापूर ठिकाणी ही सुविधा केंद्रे होणार आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com

'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)

Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com